# महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ खालील आदेश

2757

जा.क्र.प्रशासन/बीजिमसबँक/क८३/चौकशी/०७

-: कार्यालय:-

विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था,लातूर

दिनांक :- ४/१२/२००७

वाचा :- १) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३

२) महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम ७१

वाचले :- १) विशेष लेखापरिक्षक वर्ग-२,सहकारी संस्था(बँक) बीड यांनी कायदा कलम ८१ अन्वये सादर केलेले सन २००५-२००६ या कालावधीचे लेखापरिक्षण अहवाल दिनांक २८/८/२००६

बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक म.बीड या बँकेची नोंदणी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व त्याखालील नियम १९६१ मधील तरतुदी प्रमाणे झालेली असुन तीचा नोंदणी क्रमांक एम./२२२५०/५६/दिनांक ९.०२.१९५६ असा आहे असे गृहित धरण्यात आले आहे. आणि,

बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादीत बीड (यापुढे उक्त बँक असे वाचावे) या बँकेचे कामकाज महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० आणि त्याखालील महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ (यापुढे उक्त अधिनियम व नियम असे वाचावे) व बँकेच्या नोंदणीकृत उपविधीतील तरतुदीप्रमाणे करण्यात येते. या बँकेचे कार्यक्षेत्र संपूर्ण बीड महसुली जिल्हा आहे. शासनाकडील आदेश क्र.सीएसएल/१४९३/११६२/सीआर-४७ /१५-सी दिनांक २६.०७.१९९९ नुसार विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था हे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे निबंधक असुन या बँकेच्या कामकाजाबाबत उक्त अधिनियमातर्गत अधिकार त्यांना प्रदान केलेले आहे. आणि,

कायदा कलम ७३ (१) नुसार संचालक मंडळास संस्थेचे कामकाज उपविधीतील तरतुदीनुसार करणे बाबतचे अधिकार, कर्तव्ये आणि जबाबदारी निश्चीत करणेत आलेली असुन त्याप्रमाणे त्यांनी त्यांची वैधानिक कर्तव्ये व जबाबदारी पार पाडावयाची आहे. आणि अशा बँकेच्या सामयिक व वार्षिक वैधानिक लेखापरिक्षण करण्याची तरतुद महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८१ अंतर्गत करण्यात आलेली असुन त्यानुसार विशेष लेखा परिक्षक,वर्ग-२,सहकारी संस्था जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक म. बीड यांची उक्त बँकेच्या वर्ष २००५-०६ सालीचे सामयिक व वार्षिक वैधानिक लेखापरिक्षणासाठी नियुक्ती करण्यात आली आणि त्यांनी लेखापरिक्षणाचा अहवाल बँकेस व या कार्यालयास दिनांक २८/०८/२००६ रोजी सादर केला असुन सदर अहवालाच्या दोष दुरुस्तीसाठी पुरेसा कालावधी उपलब्ध होउनही बँकेने समाधानकारक दोष दुरुस्ती केलेली नाही. आणि

विशेष लेखा परिक्षक,वर्ग-२,सहकारी संस्था (बँक), बीड यांनी विस्तारीत कक्ष व नोकरभरती बाबतचा अहवाल सादर केलेला आहे व वाचा क्र.२ अन्वये उक्त अधिनियमाचे कलम ८१ खालील सन २००५-०६ चा लेखापरिक्षण अहवाल सादर केलेला आहे. सदर लेखापरिक्षण अहवालाचे अवलोकन केले असता बँकेच्या आर्थीक व्यवहारातील अनियमीतता, निधीचा गैरवापर, बँकेच्या

निधीचे अयोग्य गुंतवणूक, वसुलीचे अल्पप्रमाण, भारतीय रिझर्व्ह बँक व नाबार्डच्या परिपत्रकीय निकषाचे तसेच बँकेच्या उपविधीतील तरतुदींचे उल्लंघन करुन केलेले कर्जवाटप व त्यामुळे बँकेस झालेले आर्थीक नुकसान निश्चित करणे आवश्यक असुन तशी माझी खात्री झालेली आहे. आणि महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० अंतर्गत प्रदान अधिकार व महाराष्ट्र शासनाची अधिसुचना दिनांक ७ ऑगस्ट १९९३ अन्वये विभागीय सहनिबंधक,सहकारी संस्था यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## -: आदेश :-

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ अन्वये मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन, मी, फ.अ.शेख, विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, लातूर या आदेशान्वये सोबतच्या परिशिष्टा मध्ये नमुद केलेप्रमाणे बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक म. बीड या बँकेतील अनियमीतता बाबत व झालेले आर्थिक नुकसान निश्चित करण्यासाठी श्री. चव्हाण बी.एच.विशेष लेखापरिक्षक,सहकारी संस्था (बँक),बीड यांची चौकशी अधिकारी म्हणुन नियुक्ती करीत आहे. नियुक्ती अधिकारी यांनी त्यांचा अहवाल सदर आदेशाच्या दिनांकापासुन तीन महिन्याचे आत या कार्यालयास सादर करावा.

सदर वैधानिक चौकशी करिता लागणारी स्टेशनरी, पोष्टेज व इतर अनुषंगीक खर्च बँककडून घेवून परस्पर भागविण्यात यावा. तसेच सदर चौकशी करिता येणा-या खर्चाची जबाबदारी संबधीतांवर निश्चित करुन त्याचा समावेश आदेशात करण्यात यावा.

चौकशी अधिका-याचे मानधनाबाबतचे आदेश अलहिदा निर्गमीत करणेत येतील.

हा आदेश आज दिनांक ४/१२/२००७ रोजी माझे सहीने व या कार्यालयाचे मुद्रेसह निर्गमीत केला असे.

( फ.अ.शेख )
विभागीय सहनिबंधक,
सहकारी संस्था,लातूर

प्रति,

१) श्री. चव्हाण बी.एच.विशेष लेखापरिक्षक,सहकारी संस्था (बँक),बीड तथा चौकशी अधिकारी, बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक म. बीड यांना देवून सुचित करण्यात येते की, त्यांनी आदेशासोबत जोडलेल्या परिशिष्टा मधील प्रत्येक मुद्यांवर कलम ८३ अंतर्गत चौकशी करुन चौकशी अहवाल आदेशाचे दिनांका पासून तीन महिन्याचे आत या कार्यालयास सादर करावा.

२) कार्यकारी संचालक, बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक म.बीड यांना देवून सुचित करण्यात येते की, सदर वैधानिक चौकशीकरिता सामायिक अधिकारी यांना आवश्यक ती कागदपत्रे, रेकॉर्ड, साधने उपलब्ध करुन देण्यात येवून चौकशीचे कामी सहकार्य करावे.

३) व्यवस्थापक, बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक म.बीड यांना माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव.

४) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,बीड यांना माहितीकरिता रवाना.

५) विशेष लेखापरिक्षक वर्ग-२, सहकारी संस्था (बँक) बीड यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव रवाना.

प्रत माहितीस्तव

१) मा.कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक म.मुंबई, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, सनफोर्ट मुंबई-३२

२) मा.उप सरव्यवस्थापक,भारतीय रिझर्व बँक मुंबई

३) मा.मुख्य सरव्यवस्थापक, राष्ट्रीय कृषि व ग्रामीण विकास बँक, प्रादेशिक कार्यालय,५४ विश्वेश्वरी रोड, पोष्ट बॉक्स नं.५ शिवाजी नगर, पुणे.

प्रत माहितीस्तव सविनय सादर

१) मा.सचिव, महाराष्ट्र शासन, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग (सहकार व पणन) मंत्रालय,मुंबई

२) मा.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,महाराष्ट्र राज्य, पुणे

विभागीय सहनिबंधक,
सहकारी संस्था,लातूर

१

## परिशिष्ट

## बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक म.बीड कलम ८३ खालील चौकशीचे मुद्दे

**१) मुख्यालय रंगरगोटी व किरकोळ दुरूस्ती खर्च:-** बँकेच्या मुख्यालयाचे रंग कामासाठी व किरकोळ दुरूस्तीसाठी रू ७,२७,९८८/- खर्च करण्यात आला. दिनांक २६.११.२००५ च्या सभेमध्ये कलर स्कीम बदलास मंजूरी देवून सदर कामाची अंदाजीत किंमत पुर्वी पेक्षा रूपये २,१३,२१२/- ने वाढविण्यात आली.त्याप्रमाणे सदर कामासाठी चौकशी न करता,तुलनात्मक दर न घेता,अंदाज पत्रक न घेता काम करण्याचे ठरविले. सदर बदलानंतर कलर कामासाठी खर्च रूपये ४,४८,३५१/- व इतर दुरूस्तीसाठी रू. २,७९,८३७/- असा एकुण रू.७,२८,१८८/- खर्च करण्यात आला. जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था, बीड यांनी रूपये २,६३,०००/- च्या कामास शिफारस पत्र दिले असताना बँकेने जाणून बुजून कामावरील रूपये ४,६४,९८८/- वाढीव खर्च केला व त्यास जिल्हा उपनिबंधक यांची शिफारस घेतली नाही. बँकेस रिझर्व्ह बँकेने कलम ११ (१) अन्वये निर्बंध लादले असतानाही अशाप्रकारे मोठ्या प्रमाणावर खर्च करून बँकेचे आर्थीक नुकसान केले आहे.

**२) वार्षीक सर्वसाधारण सभा:-** सन २००४-०५ या वर्षासाठी दिनांक १३/०८/२००५ रोजी वार्षीक सर्वसाधारण सभेसाठी रूपये ३१,०५०/- खर्च करण्यात आला होता. सन २००५-०६ या वर्षासाठी वार्षीक सर्वसाधारण सभेचा खर्च वार्षीक अहवालाचा खर्च सोडून रू.४८,०३०/- झालेला आहे मागील वर्षाच्या तुलनेत सदर खर्च रू.१६,३३५/- ने जास्त आहे. सदरील सभेस हजर व्यक्तींची संख्या १४० असताना ६०० व्यक्तींचे जेवनाचे बील तयार करून बँकेचे आर्थीक नुकसान केले आहे.

**३) लिगल फिस खर्च :-** बँकेच्या कायदेशीर कामासाठी ॲड. मुळे यांची नियुक्ती दरमहा रू.२५००/- मानधनावर केली होती. बँकेने त्यांचे मानधनात वाढ करून रू ६०००/- दरमहा मानधन दिले जात आहे. श्री. मुळे यांना दरमहा मानधन देत असताना कर्मचारी खातेनिहाय चौकशीसाठी स्वतंत्र फिस देवून बँकेचे आर्थीक नुकसान केले आहे. बँकेने खातेनिहाय चौकशीसाठी श्री.एन.एम.कुलकर्णी यांची नियुक्ती केली होती. श्री. कुलकर्णी यांना रू.२४,०००/- व ॲड.मुळे यांना रू.१०,०००/- फिस अदा केली आहे. चौकशीसाठी नेमलेल्या वकीलाची फिस संबधीत कर्मचा-यांकडून वसुल करणे आवश्यक आहे. बँकेने मानधन व फिस पोटी रू.४,०८,९७२/- एवढा प्रचंड खर्च केला आहे. बँकेचे कायदेशीर सल्लागार मासिक मानधनावर कार्यरत असताना त्यांना चौकशी प्रकरणापोटी फिस देवून बँकेचे आर्थीक नुकसान केले आहे.

४) **जाहीरात खर्च :-** शासन आदेश दिनांक २/३/२००० नुसार सहकारी संस्थेने कोणत्याही व्यक्तीच्या स्वागतानिमीत्त अथवा जन्म दिनानिमीत्त शुभेच्छा जाहीराती देवू नयेत अशा सुचना असतानाही बँकेने जाहीराती दिल्या आहेत. काही जाहीरातीचे बील व जाहीरात अंक आढळून आलेले नाहीत. बँकेचे कार्यक्षेत्र जिल्हा असताना ब-याच जाहीराती जिल्हयाबाहेरील वृत्तपत्राना दिल्या जातात. जाहीरात खर्चाचे स्टेटमेंट पाहता कोणत्या पेपरला जाहीरात दिली यांची नोंद नाही. मोठया प्रमाणावर शुभेच्छा जाहीराती देवून जाहीराती पोटी रू.४,२६,८५६/- इतका खर्च केला आहे. बँकेस कलम ११(१) अन्वये निर्बंध लागू असताना व बँकेची आर्थीक परिस्थिती पाहता झालेला खर्च अयोग्य असून यात बँकेचे आर्थीक नुकसान झालेले आहे.

५) **दिवाळी शुभेच्छा जाहीरात :-** दिवाळी शुभेच्छा जाहीरात निवीदा न मागविता देण्यात आलेला आहेत. दिवाळी शुभेच्छा जाहीरातीच्या डिजीटल बोर्डासाठी एकुण रू.६०,८२५/- खर्च करण्यात आला. दिवाळी अंकाना रू.१,०६,४००/- शुभेच्छा जाहीराती दिल्या.

६) **कडा शाखेच्या कांऊटर बाबत :-** बँकेने सदर प्रकरणी फर्नीचर विक्रेते व निर्माते यांचेकडून दरपत्रक मागितले त्यानुसार कमी दरपत्रक असल्याने मनोज फर्नीचर,बीड यांना काम देण्यात आले. त्यानुसार मनोज फर्नीचर दिनांक १२/११/२००५ रोजी काम पुर्ण केल्याचे बील सादर केले परंतू त्यावर शाखाधिकारी कडा यांची शिफारस घेतली नाही. त्यानंतर शाखाधिकारी कडा यांनी दि.२१.११.२००५ रोजी फर्नीचरचे काम आदेशाप्रमाणे पुर्ण केले नसल्याचे व कामाचे त्रुटीसह मुख्यालयास कळविले.शाखाधिकारी कडा यांचा दुरूस्तीचा अहवाल प्राप्त होणेपुर्वीच संबधीत कामाचे बील अदा करण्यात आले. कॅशीअर केबीनचे बील शाखाधिकारी यांचा अहवाल गृहित न धरता अदा केले तसेच कॉऊंटर कांचेच्या तफावतीचा खुलासा केला नाही.

७) **नियमबाहय कर्जवाटप :-** बँकेची आर्थीक परिस्थीती ठिक नसताना व बँक सेक्शन ११ (१) मध्ये असतानाही नियमबाहयपणे मुदत कर्ज वाटप केले आहे. संपूर्ण बीड जिल्हयात ईलेक्ट्रीक मोटर व पाईप लाईनसाठी २२३ सभासदाना ५ वर्षाच्या मुदतीसाठी रू.२,४१,००,५५०/- (दोन कोटी एक्केचाळीस लाख पाचशे पन्नास रूपये )एवढया प्रचंड प्रमाणावर कर्ज वाटप केलेले आहे.संस्थाकडे स्थावर मालमत्ता नसताना कर्ज मंजूर करताना टिपणी मध्ये ' कर्ज मंजूर करता येत नाही ' असा शेरा असताना संचालक मंडळाने स्वत:च्या अधिकारात कर्ज मंजूर करून बँकेचे आर्थीक नुकसान केलेले आहे.

८) **बिगरशेती सहकारी संस्थेकडील सन २००५-०६ कर्ज येणे बाकी व थकबाकी -** बँकेची जिल्हयातील विविध बिगरशेती संस्थाकडील अकृषी येणे बाकी मोठयाप्रमाणावर आहे. संचालक मंडळ व

प्रशासनाने सक्तीच्या व कायदेशीर वसुलीकडे  दुर्लक्ष केले असल्याचे दिसुन येते. बिगर शेती संस्थाकडील येणे बाकी प्रचंड प्रमाणात असल्यामुळे नुक्त बँक सेक्शन ११(१) मध्ये असण्याचे मुख्य कारण आहे.

**९) बेकायदेशीर विस्तार कक्ष :-** माजलगाव मुख्य शाखेअंतर्गत लोणगाव व तालुका अंबाजोगाई शाखा बर्दापुर अंतर्गत जळगाव हे विस्तारित कक्ष सध्या कार्यरत आहेत. बँकेने १)देवडी २) बिडा ३) उजणी ४)[illegible]गाव ५) लिंबागणेश ६) चकलंबा ७) राजेगाव हे विस्तारित कक्ष खात्याची परवानगी न घेता चालु केले होते. चकलंबा व राजेगाव विस्तार कक्षाचे शाखेत रुपांतर झालेले आहे तर लोणगाव व जळगाव व्यतीरिक्त इतर विस्तारीत कक्ष बंद झालेल्या आहेत. विस्तारित कक्षामुळे जागे भाडेपोटी दिलेल्या रक्कमेचे नुकसान झालेले असुन फर्नीचर व संगणक खराब झालेले आहे. विस्तारीत सेवा कक्षाचे कांऊटर,फर्नीचर व इमारत भाडे यासाठी बँकेचे रु २.९५ लाखाचे नुकसान झालेले आहे.

**१०) बेकायदेशीर नोकरभरती बाबत :-** बँकेने कर्मचारी भरती करताना खात्याची परवानगी घेवून प्रचलित पध्दतीने भरती केलेली नाही. मा. सहकार आयुक्त व निबंधक,सहकारी संस्था,महाराष्ट्र राज्य,पुणे यांचेकडे १९९६ मध्ये २०० कर्मचारी भरण्याचा प्रस्ताव सादर केला होता. त्यानंतर बँकेची आर्थीक स्थिती सुधारल्यावर नोकर भरती बाबत विचार करता येईल असे कळविले होते. असे असतानाही बँकेने मुख्यालयात व शाखास्तरावर विनापरवानगी भरती केलेली आहे. बंक सेक्शन ११ (१) चे पालन करीत नसताना विनापरवानगी भरती करून बँकेचे आर्थीक नुकसान केले आहे.

११) शाखा स्थरावरील १५ शाखाचे ६५६८०६.६० रक्कमेचे आय.बी.पी.प्रलबीत आहेत. संबधीत कालावधीचे व विद्यमान शाखाधिकारी/कर्मचारी यांनी जबाबदारी पार पाडली असल्याचे दिसुन येत नाही.

१२) संचालक मंडळ सभा दि.१३.८.०५ मधील ठराव क्रं.३ अन्वये विविध खर्चाच्या बीलास मंजूरी देणारा ठराव पास केला आहे. त्यात मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा कार्यकारी अधिकारी जिल्हा देखरेख संघ म. बीड यांचेकरीता किरायाने घेतलेली जीप क्रमांक एम.एच.२३ ई २४९० चे जुन २००५ चे २८ दिवस भाडे इंधनखर्च ११,१५३.०० जीप भाडे ९,८००.०० एकुण २०,९५३.०० तसेच संचालक मंडळ सभा दि.२९.४.०५ मधील ठराव क्रं.२ अन्वये विविध प्रकारच्या बिलामध्ये २७ दिवसाच्या जीपभाडे व इंधन खर्च २०,६५०.०० खर्च टाकला आहे.  मुख्य कार्यकारी अधिकारी हे  जिल्हा देखरेख संघाचे अधिकारी असुन ती स्वायत्त व  स्वतंत्र संस्था आहे.जिल्हा देखरेख सहकारी संघावर खर्च न टाकता बँकेवर खर्च टाकला असुन सदरील खर्चास संचालक मंडळाने मान्यता देवून बँकेच्या हितास बाधा आणलेली आहे.

१३) दि.२९/९/२००५ चे कार्यकारी समितीचे सभेत कर्मचा-यांच्या पगारवाढी संदर्भात अभ्यास समितीच्या अहवालावर केलेल्या शिफारशी बाबत निर्णय घेणारा ठराव मंजूर केला आहे.सदर प्रकरणी जिल्हाउपनिबंधक,सहकारी संस्था,बीड यांनी बँक सेक्शन ११ (१) मध्ये असल्याने विभागीय सहनिबंधक,सहकारी संस्था,लातूर यांचे निदर्शनास आणुन देणे बाबत सुचना केलेली असताना व सदरील प्रकरणी या कार्यालयाची मान्यता नसताना बँकेतील कर्मचा-यांना पुर्वलक्षी प्रभावाने पगारवाढ करून बँकेला मोठया प्रमाणात अधिकचा खर्च सहन करावा लागला आहे. पर्यायाने बँकेचे नुकसान झालेले आहे.

१४) दिवाळी व रमजान ईद सणानिमीत्त बँकेच्या सभासद, ग्राहक, ठेवीदार सर्व जनतेस शुभेच्छा दर्शक डिजीटल बोर्ड सर्व शाखा व विस्तारित कक्षामध्ये बसविण्यात आले. त्याचे बील रू.६०,८२५.६० व प्रिंटींग कार्ड बील रू.५८,५००/- खर्च करून बँकेचे आर्थीक नुकसान करण्यात आले.

१५) बँकेचे कंपाऊंड वॉल व परिसरात रंग सफेदी करून घेण्यासाठी अपेक्षीत खर्च १,६३,०००/- व वाढीव खर्च २,९२,२९२/- व कडा शाखेच्या स्थंलातराचा खर्च १,७९,२००/- केलेला आहे. संचालक मंडळाची मान्यता असलेला खर्च व प्रत्यक्षातील बीले यात मोठया प्रमाणात फरक आहे. अधिक झालेल्या खर्चास संबधीत विभाग प्रमुख,व्यवस्थापक व संबंधित संचालक जबाबदार आहेत.

१६) दादेगाव शाखेच्या व्यवहाराबाबत :- बँकेने दिनांक १५.१.२००५ चे मा. कार्यकारी समितीचे सभेतील ठराव क्र.१० (३) नुसार मार्केट यार्ड कडा शाखा दादेगाव येथे स्थलांतर करण्यात आले. मात्र शाखेत व्यवहार कमी असल्याचे कारणावरून मार्केट यार्ड कडा शाखा पुर्ववत त्याच ठिकाणी आणण्यात आली. सदरील स्थंलातरामुळे झालेल्या खर्चामुळे बँकेचे आर्थीक नुकसान झाले आहे.

१७) अंबाजोगाई तालुक्यातील वसुलीसाठी किरायाने घेतलेल्या जिपचे ३० दिवसाचे भाडे रू २१,३३७ व आष्टी तालुक्यातील किरायाने घेतलेली जीपचे ३० दिवसाचे भाडे रू. २०१२८.९८ खर्च केलेला आहे. वसुलीसाठी गाडी भाडयावर मोठया प्रमाणात खर्च करण्यात आलेला आहे. सदरचा खर्च सकृत दर्शनी संशयास्पद असल्याचे निदर्शनास येते.

१८) जयभवानी सहकारी साखर कारखाना लि. शिवाजीनगर ता. गेवराई यांचे तात्पुरते कर्ज रू.१०० लाख मंजूर केलेले आहे. बँक कालम ११(१) मध्ये असताना रू.१०० लाख कर्ज मंजूर करणे योग्य नाही.त्यामुळे बँकेचे आर्थीक नुकसान संभवते आहे.

१९) केज तालुका सहकारी खरेदी विक्री संघ म. केज या संस्थेस १२ मध्ये ५ वर्षे मुदतीच्या परतफेडीच्या अटीवर रू.२.५० लाख मंजूर करण्यात आले होते. संघाकडे येणे बाकी असलेल्या रू.३,७६,६१७/-पैकी

रू.२,५०,०००/- वसुल केले असुन ४७,०६८/- संघाकडे येणे बाकी असताना संस्थेचे खाते बेबाक करण्याचा निर्णय घेण्यात आला व बँकेस आर्थीक नुकसानीत ढकलण्यात आले.

२०) बँकेकडे ४ गाडया असताना कार्यालयाने कामानिमीत्त टाटा सुमो गाडी क्र.एल.एन.४४ बी.१८३ चे भाडे सप्टेंबर २००५ मधील प्रतिदीन रू.४५०/- प्रमाणे एकुण ३० दिवसाचे भाडे रू.१३५००/- करण्यात आलेले आहेत. सदर खर्च संशयास्पद असल्याने जबाबदारी निश्चित करण्यास पात्र आहे.

२१) कार्यकारी समिती सभा दिनांक २८.११.२००५ अन्वये दै. लोकमत,औरंगाबाद यांचे दिवाळी शुभेच्छा जाहीरात रू.११००/- खर्च करण्यात आलेला आहे. मा. सहकार आयुक्त व निबंधक,सहकारी संस्था,महाराष्ट्र राज्य,पुणे यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७९ अन्वये सण,उत्सव ,जंयती या निम्मीताने जाहीरात देण्यास प्रतिबंध केलेला आहे. एकावेळी एका जाहीरातीसाठी कमाल रू.५०००/- एवढी जाहीरात देता येते.परंतु जालीच्या जाहीरात खर्च करून बँकेचे आर्थीक नुकसान केले आहे.

२२) वैष्णवीमाता तेलबिया कृषी औद्योगीक प्रकिया सहकारी संस्था म. मलकापुर ता. परळी वैजनाथ कर्ज मागणी अर्जाप्रमाणे रू.२० लाख मंजूर केलेले आहे. संस्थेच्या अध्यक्ष हे निमशासकिय कर्मचारी पतसंस्थेत अध्यक्ष आहेत.सदर संस्थेकडुन बँकेचे रू.१२ लाख येणे बाकी आहे. सदरील संस्थेचे नामांतर वैजनाथ तेलबीया प्रकिया असे करून बँकेची फसवणुकीचा इरादा दिसुन येतो. मात्र प्रस्तावाची छाननी न करता बँकेने रक्कम दिली असल्याने रक्कम बुडण्याची शक्यता आहे.

२३) धारूर तालुका फळे भाजीपाला सहकारी खरेदी विक्री संघ म. धारूर या संस्थेचा कॅश क्रेडीट व्यवहार बरोबर नसताना, तसेच उलाढाल व कर्ज फेडी बाबत कोणताही प्रस्ताव नसताना, संस्थेस पूरबणी कर्ज रू.७.५० लाख मंजुर केलेले आहे. संस्थेकडे स्थावर मालमत्ता नसताना, परतफेडी बाबत कोणतेही कागदपत्र नसताना, पुर्वीचे कर्ज थकित असतानाही कर्ज मंजूर केले आहे. तसेच टिपणीमध्ये 'कर्ज मंजूर करता येत नाही.' असा शेरा असताना संचालक मंडळाने कर्ज मंजूर केलेले आहे व बँकेस आर्थीक नुकसानीत ढकलेले आहे.

२४) शेतकरी शेतीमाल सहकारी फळे भाजीपाला सहकारी संस्था म. आबेवडगाव ता. धारूर या संस्थेच्या कॅश क्रेडीट व्यवहार बरोबर नसताना तसेच उलाढाल व कर्ज फेडी बाबत कोणताही प्रस्ताव नसताना संस्थेस पुरबणी कर्ज रू.७.५० लाख मंजूर केलेले आहे. संस्थेकडे स्थावर मालमत्ता नसताना परतफेडीबाबत कोणतेही कागदपत्र नसताना पुर्वीचे कर्ज थकित असतानाही कर्ज मंजूर केले आहे. तसेच

टिपणीमध्ये 'कर्ज मंजूर' करता येत नाही असे लिहीले असताना संचालक मंडळाने कर्ज मंजूर केलेले आहे व बॅंकेस आर्थीक नुकसानीत ढकलेले आहे.

२५) धारूर तालुका खवा उत्पादकाची खरेदी विक्री संस्था म. धारूर या संस्थेस दिनाक २.१०.२००४ अन्वये कॅश क्रेडीट रू.६ लाख मंजूर केले होते. सदरील संपूर्ण कर्ज थकित आहे. कर्जास आक्षेप असताना २००४ मध्ये मंजूर केलेले आहे.

२६) रामेश्वर सहकारी फळे भाजीपाल पुरवठा व प्रकिया म. नांदूरघाट ता.केज या संस्थेस रू.६ लाख क्लीन कॅश क्रेडीट मंजूर केले आहे.सदरील कर्जास आक्षेप असताना २००४ मध्ये कर्ज मंजूर केलेले आहे.

२७) वडवणी तालुका खरेदी विक्री संघ म. वडवणी :- दिनांक १८.३.२००४ मधील ठराव क्रं.१(१२) अन्वये रू.३५ लाख तात्पुरते अंतरीम कर्ज जनावराचे छावनीचे अनुशांगीक खर्चासाठी मंजूर केले होते. सदरील कर्ज थकित झाले असुन दि.३१.३.०६ वर रू.४९,०५,३०२/- येणे बाकी आहे. छावनीच्या शासनाकडून आलेल्या रक्कमा जमा झालेल्या नाहीत. शासनाकडून अनुदान आलेले असले तरी अद्याप पर्यंत कर्ज थकित दिसून येते.

**विभागीय सहनिबंधक,**
**सहकारी संस्था,लातुर**